# जरा याद करो कुर्बानी...
# 80व्या स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**प्रिय भारतीय बंधु-भगिनींनो,**

15 ऑगस्ट 1947: भारताचा स्वातंत्र्यदिन. दीडशे वर्ष चाललेल्या स्वातंत्र्यलढ्यात असंख्य बलिदान दिल्यानंतर उगवलेला दिवस. इंग्रजांची गुलामगिरी झुगारून उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल सुरू होण्याचा दिवस. सत्याग्रह व अहिंसेने लढलेल्या भारतीय जनतेने ब्रिटिश साम्राज्याचा अस्त केला तो दिवस.

म्हणूनच, स्वातंत्र्यदिन हा आपल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करून त्यांना आदरांजलीचा वाहण्याचाही दिवस आहे.

## भारतीय स्वातंत्र्यलढा: अभूतपूर्व जनआंदोलन



भारतीय स्वातंत्र्यलढा हे आजपर्यंतचे जगातील सर्वात मोठे जनआंदोलन आहे. यात 20% भारतीय सहभागी झाले होते. स्वातंत्र्य चळवळीला सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवले ते राष्ट्रपिता महात्मा गांधींनी. स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रवास अनेक आंदोलनांनी आणि बलिदानांनी भरलेला होता. असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग आंदोलन आणि 'भारत छोडो' आंदोलन, यांसारखी अनेक आंदोलने करून भारतीयांनी ब्रिटिश सत्तेला झुकवले.

## स्वातंत्र्यलढ्याची विशेषता: हिंदू-मुस्लिम-शीख-ईसाई-आदिवासी-दलित एकता

सर्व जाती-धर्माच्या लोकांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. क्रांतिकारी राम प्रसाद बिस्मिल आणि अशफाकउल्ला खान हे दोघे मित्र सोबत फासावर गेले. सोलापूरचे स्वातंत्र्यसैनिक मलप्पा धनशेट्टी आणि कुर्बान हुसैन यांनाही सोबतच फाशी दिली गेली. अशी असंख्य उदाहरणे आहेत. विविधतेत एकता हीच भारताची खरी ओळख आहे. एकता-बंधुतेचा वारसा आपल्याला स्वातंत्र्यचळवळीने दिला आहे.

## स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासींचा सहभाग

आदिवासींनी देशभर इंग्रजांविरोधात झुंझार लढे दिले. बिरसा मुंडा, तंट्या भिल यांसारख्या अनेक आदिवासींनी याचे नेतृत्व केले. झारखंड-बिहारमधील संथाळ उठाव, महाराष्ट्रातील चिरनेर सत्याग्रह, यांसारख्या अनेक आंदोलनात आदिवासींनी दिलेले बलिदान देश कधीही विसरू शकणार नाही.



## स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचा सहभाग

स्वातंत्र्यलढ्यात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलाही खंबीरपणे लढल्या. 'चूल आणि मुल' या चौकटीत कैद महिलांना स्वातंत्र्यलढ्याने मुक्त केले. महात्मा गांधी आणि नेहरूंच्या प्रेरणेने लाखो महिलांनी स्वतःला स्वातंत्र्यचळवळीत झोकून दिले.

इंग्रजांचा गोळीबार आणि लाठीमार महिलांना घाबरवू शकला नाही. झेंडा फडकवताना कनकलता बरुआ यांसारख्या अनेक महिला शहीदही झाल्या. 'चले जाव' आंदोलनाच्या एक दिवस आधी स्वातंत्र्यलढ्यातील सर्व मोठ्या नेत्यांना इंग्रजांनी तुरुंगात टाकले. ते आंदोलन लाखो महिलांनीच पुढे नेले.

## स्वातंत्र्यलढ्यातील लहान मुलांचा सहभाग

देशासाठी जीवाची बाजी लावण्यात लहान मुलेही मागे नव्हती. नंदुरबारचा शिरीष कुमार, पुण्यातील नारायण दाभाडे, कोल्हापूरचा बिंदू माधव कुलकर्णी, खान अब्दुल गफारखान यांच्या संघटनेतील लहान मुले – यांसारख्या अनेक लेकरांनी देशासाठी बलिदान दिले आहे.

## स्वातंत्र्यलढ्याचा विचार: स्वातंत्र्य-समता-बंधुता-धर्मनिरपेक्षता



इंग्रजांची 'फोडा आणि राज्य करा' कुटनीती स्वातंत्र्यसैनिकांनी स्पष्टपणे नाकारली. भगतसिंह, महात्मा गांधी, नेहरू, नेताजी बोस, सरदार पटेल, सरोजिनी नायडू, मौलाना अबुल कलाम आझाद यांसारख्या अनेक नेत्यांनी धार्मिक आणि सामाजिक एकतेचा पुरस्कार केला. म्हणूनच देश स्वतंत्र होऊ शकला.

## 'भारत भाग्यविधाता' म्हणजेच: 'आम्ही भारताचे लोक'

स्वातंत्र्यसैनिकांचे स्वप्न देशाला फक्त इंग्रजांपासून मुक्त करण्यापुरते मर्यादित नव्हते. इंग्रज गेल्यावर देश कसा घडवायचा याचाही ते विचार करत होते. स्वातंत्र्यसैनिकांच्या विचारांचा केंद्रबिंदू 'माणूस' होता. प्रत्येक माणसाला सन्मानाने व स्वाभिमानाने जगता येईल, अशी व्यवस्था त्यांना निर्माण करायची होती.




स्वातंत्र्यलढ्यातील समता, लोकशाही, धर्मनिरपेक्षता व स्त्री-पुरुष समानता मूल्ये बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली बनलेल्या संविधानातही आली आणि संविधानाचे प्रमुख स्तंभ बनली.

- **संविधानाने देशाला एकसंध ठेवले:** धर्म, परंपरा, भाषा यांत प्रचंड विविधता असूनही, भारत एकसंध-एकत्र राहिला.
- **संविधानाने आपल्याला लोकशाही दिली:** स्वातंत्र्याच्या 78 वर्षांनंतरही भारतात लोकशाही कायम आहे.
- **संविधानाने गावांचा विकास केला:** आपल्या गावची ग्रामपंचायत, शाळा, दवाखाना, रस्ता, वीज, पिण्याचे पाणी, सहकारी पतसंस्था – हे सर्व संविधानामुळेच शक्य झाले.
- **संविधानाने शेतकऱ्यांचा विकास केला:** शेतकऱ्यांना बी-बियाणे, कीटकनाशके, वीज, स्वस्त दरात बँक कर्ज; पीकाला चांगला भाव मिळण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्या – हे सर्व संविधानामुळेच मिळाले.
- **संविधानाने महिलांचा सन्मान केला:** पूर्वी 'चूल आणि मूल' यात कैद महिलांना संविधानाने सन्मान दिला. सरपंच, न्यायाधिश, मुख्यमंत्री, राष्ट्रपती – या सर्व पदांवर महिला पोहोचू शकल्या त्या संविधानामुळेच.
- **संविधानाने सामाजिक न्याय दिला:** शतकानुशतके शोषणाचे बळी ठरलेले एससी, एसटी, एनटी, ओबीसी व अन्य समाजांसाठी संविधानाने 'आरक्षणा'ची तरतूद केली.



**संविधानाचा जागर करून स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करूया!** स्वातंत्र्यसैनिकांनी स्वप्ने भारतीय संविधानात आहेत. त्यामुळे संविधानाचे पालन हीच खरी देशभक्ती आहे! संविधानाचा विचार प्रत्येकापर्यंत पोहोचवण्यासाठी 'संविधान जागर अभियान' सुरू झाले आहे. तुम्हीही यात सहभागी व्हा! जय भारत! जय संविधान!

## संविधान जागर अभियान

**संविधान जागर अभियान निमंत्रक समिती:** मा. न्या. बी. जी. कोळसे पाटील, मा. न्या. अभय ठिपसे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

स्वप्निल फुसे: 79723 45764 | डॉ. श्याम मुडे: 94047 08852 | श्रद्धा रेखा राजेंद्र: 92704 78335 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739

samvidhan.jagar samvidhanjagar.org